## // प्रेस नोट //

दिनांक ०३/०१/२०१९

**राजेंद्र बापु जाधव , वय ५१ वर्षे, तलाठी सज्जा वाहीरा ता.आष्टी व २)आशिष कल्याण जाधव, वय-२६ वर्षे, तलाठी यांचे मदतनीस (खाजगी ईसम) रा.कडा ता.आष्टी यांना ३,०००/- रुपयाची लाच घेतांना रंगेहात पकडले.**

---

दि.०२/०१/२०१९ रोजी तक्रारदार यांनी तक्रार दिली की, तक्रारदार यांचे जमिनीची खातेफोड करुन नवीन ७/१२ देण्यासाठी तलाठी सज्जा वाहिरा ता.आष्टी येथील तलाठी राजेंद्र जाधव व त्यांचे मदतीनस आशिष जाधव हे ३,०००/- रुपये लाचेची मागणी करीत आहेत. वगैरे मजकुराची तक्रार दिली.

सदर तक्रारीवरुन कडा येथे पंचासमक्ष लाच मागणी बाबत खात्री केली असता तलाठी राजेंद्र जाधव व त्यांचे मदतीनस आशिष जाधव यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे कामासाठी ३,०००/- रुपये लाचेची मागणी करुन लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केले.

त्यावरुन आज दिनांक ०३/०१/२०१९ रोजी राजेंद्र जाधव व त्यांचे मदतनीस आशिष जाधव यांचे विरुध्द कडा येथील तलाठी सज्जा कार्यालय परिसरात लाचेचा सापळा आयोजित केला असता तलाठी राजेंद्र जाधव यांचे सांगणेवरुन त्यांचे मदतनीस आशिष जाधव यांना तक्रारदार यांचेकडून ३,०००/- रुपयाची लाच रक्कम स्विकारतांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. यशस्वी सापळा कारवाई झाल्यानंतर तलाठी राजेंद्र जाधव हे जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे बैठकीसाठी आले असल्याने त्यांना जिल्हाधिकारी कार्यालय, बीड समोरुन ताब्यात घेण्यात आलेले आहे. असून **राजेंद्र बापु जाधव , वय ५१ वर्षे, तलाठी सज्जा वाहीरा ता.आष्टी व २) आशिष कल्याण जाधव, वय-२६ वर्षे, तलाठी जाधव यांचे मदतनीस (खाजगी ईसम)** यांचेविरुध्द पोस्टे आष्टी येथे लाचलुचपत प्रतिबंधक कायदा १९८८ (सुधारणा २०१८) प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु आहे.

सदरची कारवाई मा.श्री.श्रीकांत परोपकारी, पोलीस अधीक्षक एसीबी औरंगाबाद, मा.श्री.एस.आर.जिरगे, अपर पोलीस अधीक्षक, एसीबी औरंगाबाद यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधीक्षक श्री.बाळकृष्ण हनपुडे पाटील व टीम एसीबी बीड यांनी केली आहे.

याद्वारे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, त्यांचे सरकारी कामासाठी लोकसेवक लाचेची मागणी करीत असल्यास त्यांनी खालीलप्रमाणे संपर्क साधावा.

| | | |
|---|---|---|
| **टोल फ्री क्रमांक** | :- | १०६४ |
| **दुरध्वनी क्रमांक** | :- | ०२४४२/२२२६४९ |
| **मेल आयडी** | :- | dyspacbbeed@gmail.com |
| **वेबसाईट** | :- | www.acbmaharashtra.gov.in |
| **मोबाईल ॲप** | :- | www.acbmaharashtra.net |
| **फेसबुक पेज** | :- | www.facebook.com/MaharashtraACB |

३/१/१९

**( बाळकृष्ण हनपुडे पाटील)**
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,बीड.

Scanned by CamScanner